केंद्र शासनाच्या नैसर्गिक आपत्ती (SDRF/NDRF) निकषाच्या धर्तीवर नैसर्गिक आपत्तींमुळे बाधित होणा-या आपद्‌ग्रस्त व्यक्तींना सन २०१५ ते सन २०२० या कालावधीमध्ये द्यावयाच्या मदतीचे दर व निकष

महाराष्ट्र शासन
महसूल व वनविभाग
शासन निर्णय क्रमांक : सीएलएस-२०१५/प्र.क्र.४०/म -३,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२
दिनांक : १३ मे, २०१५

वाचा :

(१) महसूल व वन विभाग, शासन निर्णय क्र.सीएलएस-५९८३/२४८३६१/प्र.क्र.८२०/म-३, दि. ३१.०१.१९८३
(२) महसूल व वन विभाग, शासन निर्णय क्र.सीएलएस-०६०४/प्र.क्र.१६८/म-३, दि. १९.०८.२००४
(३) महसूल व वन विभाग, शासन निर्णय क्र.सीएलएस-२०१०/प्र.क्र.७१/म-३, दि. २६.०३.२०१०
(४) केंद्र शासनाच्या गृहमंत्रालयाचे पत्र क्र.२-३/२०१०- एनडीएम-१, दि. २८.०९.२०१०
(५) केंद्रशासनाच्या गृह मंत्रालयाचे पत्र क्र. ३२-७/२०११-एनडीएम-१, दि .१६.०१.२०१२
(६) महसूल व वन विभाग, शासन परिपत्रक क्र.एससीवाय-०४/२०१२/प्र.क्र.५८/म-११, दि. ९.५.२०१२
(७) केंद्र शासनाच्या गृह मंत्रालयाचे पत्र, क्र. ३२-३/२०१०-एनडीएम-१, दि.१३.०८.२०१२
(८) केंद्र शासनाच्या गृह मंत्रालयाचे पत्र, क्र. ३२-३/२०१२-एनडीएम-१, दि.२८.०९.२०१२
(९) केंद्र शासनाच्या गृह मंत्रालयाचे पत्र क्र. ३२-३/२०१३-एनडीएम-१, दि.२१.०६.२०१३
(१०) केंद्र शासनाच्या गृह मंत्रालयाचे पत्र क्र.३२-३/२०१३-एनडीएम-१, दि.२८.११.२०१३
(११) महसूल व वन विभाग, शासन निर्णय क्र.सीएलएस-२०१२/प्र.क्र.१५७/म-३, दि.३०.१.२०१४
(११) महसूल व वन विभाग, शासन परिपत्रक क्र.सीएलएस-२०१२/प्र.क्र.१५७/म-३, दि.५.८.२०१४
(१२) केंद्र शासनाच्या गृह मंत्रालयाचे पत्र क्र.३२-७/२०१४-एनडीएम-१, दि.८.४.२०१५

प्रस्तावना:-

राज्यामध्ये नैसर्गिक आपत्तीच्या घटनांमध्ये बाधित होणा-या व्यक्तिंना मदत देण्याकरिता केंद्र शासन / राज्य शासन यांनी संयुक्तपणे राज्य आपत्ती प्रतिसाद निधीची(State Disaster Response Fund : SDRF) स्थापना केली आहे. केंद्र शासनाने वर नमूद दि.८ एप्रिल, २०१५ च्या पत्राव्दारे सन २०१५ ते २०२० या कालावधीकरिता राज्य आपत्ती प्रतिसाद निधीचे सुधारित निकष व दर निश्चित केले आहेत. त्यानुसार सदर दर दि.१ एप्रिल, २०१५ पासून लागू करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. त्या अनुषंगाने शासनाने पुढीलप्रमाणे निर्णय घेतला आहे.

शासन निर्णय :-

केंद्र शासनाने नैसर्गिक आपत्तीमध्ये होणा-या जीवित व वित्तहानीसाठी संदर्भाधीन दि.८ एप्रिल, २०१५ च्या पत्रान्वये सन २०१५ ते २०२० या कालावधीकरिता राज्य आपत्ती प्रतिसाद निधीचे निकष व दर सुनिश्चित केले आहेत. सदर निकष व दर राज्य शासनाने स्वीकृत केले असून, त्याची अंमलबजावणी **दि.१ एप्रिल, २०१५ पासून** लागू करण्यास या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात येत आहे.

२. देशातील इतर राज्यांमध्ये केंद्र शासनास मान्य असलेली, पैसेवारी काढण्याची व दुष्काळ जाहीर करण्याची जी प्रचलित पध्दत आहे ती अवलंबिण्यात यावी. त्यानुसार पैसेवारी व दुष्काळ

जाहीर करण्याबाबत आवश्यक ती कार्यवाही करण्यास मान्यता देण्यात येत आहे. यासंदर्भात सविस्तर आदेश संबंधित म-७ कार्यासनाकडून आवश्यकतेनुसार निर्गमित करण्यात येतील.

३. केंद्र शासनाने नैसर्गिक आपत्तीच्या मदतीच्या निकषामध्ये अथवा प्रमाणामध्ये बदल केल्यास, सदर बदल आहे त्या सुधारित स्वरुपात राज्यामध्ये त्या त्या दिनांकापासून लागू राहतील.

४. केंद्र शासनाच्या सुधारित निकषानुसार विहित केलेल्या अटी व शर्तीनुसार यापुढे बाधित आपद्ग्रस्तांना प्रचलित पध्दतीनुसार जिल्हास्तरावर विहित वेळेत मदत मंजूर करण्यात यावी. याव्यतिरिक्त अन्य कोणतीही “विशेष मदत” देण्याबाबत अत्यंत निकडीच्या प्रकरणात आवश्यकता असल्यास संबंधित प्रशासकीय विभागाने योग्य त्या समर्थनासह मंत्रिमंडळासमोर प्रस्ताव सादर करण्याची बाब दि.३० जानेवारी, २०१४ च्या शासन निर्णयामध्ये नमूद केल्याप्रमाणे यापुढेही लागू राहील.

५. नैसर्गिक आपत्तीअंतर्गत आपद्ग्रस्त बाधित व्यक्तींना मदत देण्यासाठी केंद्र शासनाच्या सुधारित निकषानुसार द्यावयाच्या मदतीबाबतचे “**परिशिष्ट**”या शासन निर्णयासोबत जोडले आहे. सदर परिशिष्टातील तसेच या शासन निर्णयातील नियम व अटींच्या अधीन राहून, आपद्ग्रस्तांना मदत अनुज्ञेय राहील व त्यानुसार आपद्ग्रस्त व्यक्तींना मदत देण्याबाबत संबंधित क्षेत्रिय यंत्रणांनी तातडीने कार्यवाही करावी. तसेच यापुढे केंद्र शासनाने मदतीच्या निकषामध्ये अथवा प्रमाणामध्ये बदल केल्यास, त्यानुसार कार्यवाही करणे आवश्यक ठरेल.

६. केंद्र शासनाच्या विहित सूचनांनुसार आपत्ती व्यवस्थापन अधिनियम, २००५ च्या कलम २१ अन्वये स्थापन करण्यात आलेल्या राज्यस्तरीय समितीच्या (राज्य कार्यकारी समिती-State Executive Committee) च्या मान्यतेची आवश्यकता आहे. अशी प्रकरणे, मा.मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखालील राज्य कार्यकारी समितीसमोर सादर करण्याची जबाबदारी संबंधित प्रशासकीय विभागांची राहील. याबाबतचे समन्वय वित्तीय सल्लागार, मदत व पुनर्वसन यांचेमार्फत करण्यात यावे.

७. केंद्र शासनाच्या विहित सूचनांनुसार केंद्रीय पथकाने पाहणी करण्याबाबतचा प्रस्ताव तसेच सर्वेक्षणाअंती मदतीबाबतचे योग्य ते प्रस्ताव संबंधित प्रशासकीय विभागाने महसूल व वन विभाग (मदत व पुनर्वसन) यांचेमार्फत केंद्रीय पथक/राष्ट्रीय आपत्ती निवारण निधी (NDRF) यांच्याकडे सादर करावेत.

८. राज्य शासनाने वेळोवेळी नैसर्गिक आपत्तीमध्ये नुकसानीकरिता मदत देण्याबाबतची प्रक्रिया व जबाबदारी निश्चित केली असून, तसेच मदतीबाबत पंचनामे कशाप्रकारे करावेत याबाबत वेळोवेळी आदेश निर्गमित केले आहेत. यामध्ये कोणताही बदल न करता, केंद्र शासनाने विहित केलेल्या अटी व शर्तीनुसार केंद्र शासनाच्या मदतीच्या प्रमाणात आपद्ग्रस्तांना तात्काळ मदत देण्याची जबाबदारी संबंधित प्रशासकीय विभागाची असेल. त्यासाठी विहित निकषानुसार निधीचे वितरण राज्य आपत्ती प्रतिसाद निधीमधून मदत व पुनर्वसन विभागामार्फत केले जाईल. विविध मदतीपेक्षा अधिकची मदत देणे आवश्यक असल्याचे विभागाचे मत असल्यास, त्या संबंधित प्रशासकीय विभागाने योग्य त्या समर्थनासह त्याबाबतचा प्रस्ताव मंत्रिमंडळाच्या मान्यतेसाठी सादर करावा. राज्यातील प्रशासकीय विभागांनी नैसर्गिक आपत्ती निवारणासंदर्भात केलेल्या कार्यवाहीचा तपशील महसूल व वन विभाग (मदत व पुनर्वसन) यांना तातडीने कळविण्याची जबाबदारी संबंधित प्रशासकीय विभागांची राहील.

९. वरीलप्रमाणे विहित नैसर्गिक आपत्तीमुळे झालेल्या नुकसानीसाठी "२२४५, नैसर्गिक आपत्तींच्या निवारणासाठी सहाय्य" या मुख्य लेखाशीर्षाखालील तरतुदीमधून मदत अनुज्ञेय असेल.

१०. सदर आदेशाचे सर्व क्षेत्रिय यंत्रणांनी तसेच संबंधीत मंत्रालयीन प्रशासकीय विभागांनी काटेकोरपणे पालन करावे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१५०५१८१८४५००९९१९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Ashok Rajaram Jagtap

Digitally signed by Ashok Rajaram Jagtap
DN: CN = Ashok Rajaram Jagtap, C = IN, S = Maharashtra, O = Government Of Maharashtra, OU = Under Secretary
Date: 2015.05.18 18:46:37 +05'30'

(अ. रा. जगताप)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१) सर्व अप्पर मुख्य सचिव / प्रधान सचिव / सचिव, मंत्रालयीन विभाग
२) सर्व विभागीय आयुक्त
३) आयुक्त, कृषि, कृषि संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे
४) सर्व जिल्हाधिकारी
५) सर्व आयुक्त, महानगरपालिका
६) आयुक्त तथा संचालक, नगरपरिषद प्रशासन संचालनालय, वरळी, मुंबई ३०
७) सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी,जिल्हा परिषदा
८) सर्व जिल्हा कोषागार अधिकारी,
९) महालेखापाल -१/२ (लेखाअनुज्ञेयता) महाराष्ट्र, मुंबई/नागपूर (प्रत्येकी ३ प्रती)
१०) महालेखापाल -१/२ (लेखापरिक्षा) महाराष्ट्र, मुंबई/नागपूर (प्रत्येकी ३ प्रती)
११) संचालक, लेखा व कोषागारे, संगणकशाखा, नवीन प्रशासकीय भवन,मुंबई-३२
१२) संचालक, माहिती व जनसंपर्क संचालनालय, मंत्रालय, मुंबई-३२.
१३) सर्व मंत्रालयीन विभाग,
१४) महसूल व वन विभागातील सर्व कार्यासने,
१५) उपसचिव, (आव्यप्र-१/आव्यप्र-२/म-७/म-११/ब-१/पीएसी/पीएसी-१), महसूल व वन विभाग, मंत्रालय,मुंबई
१६) वित्त विभाग (व्यय-९ /व्यय-३/अर्थसंकल्प-३/अर्थसंकल्प-६), मंत्रालय, मुंबई.
१७) म-३ कार्यासन (निवडनस्ती).

<u>**प्रत माहितीसाठी अग्रेषित**</u>

१) मा.मुख्यमंत्री महोदयांचे प्रधान सचिव
२) मा.मंत्री, मदत व पुनर्वसन यांचे विशेष कार्य अधिकारी
३) मा.राज्यमंत्री, मदत व पुनर्वसन यांचे खाजगी सचिव
४) मुख्य सचिव यांचे विशेष कार्य अधिकारी
५) सचिव (मदत व पुनर्वसन) यांचे स्वीय सहाय्यक
६) संचालक (आपत्ती व्यवस्थापन प्रभाग) यांचे स्वीय सहाय्यक

महसूल व वन विभाग, शासन निर्णय क्र.सीएलएस-२०१५/प्र.क्र.४०/म-३,
दिनांक - १३ मे, २०१५ सोबतचे परिशिष्ट

REVISED LIST OF ITEMS AND NORMS OF ASSISTANCE FROM STATE DISASTER RESPONSE FUND (SDRF) AND NATIONAL DISASTER RESPONSE FUND (NDRF)

राज्य आपत्ती प्रतिसाद निधी (SDRF) व राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद निधी (NDRF) मधून सुधारित बाबी व निकषानुसार देण्यात येणारे अर्थसहाय्य

No	ITEM	NORMS OF ASSISTANCE
१	GRATUITOUS RELIEF	
	a) Ex-Gratia payment to families of deceased persons	Rs.४.०० lakh per deceased person including those involved in relief operation or associated in preparedness activities, subject to certification regarding cause of death from appropriate authority.
	अ) आपद्ग्रस्त मृत व्यक्तीच्या कुटुंबियांना देय आर्थिक सहाय्य	योग्य त्या प्राधिकाऱ्याने मृत्यूचे कारण प्रमाणित करण्याच्या अधीन राहून मृत व्यक्तीच्या वारसांना रु.४.०० लाख इतकी मदत अनुज्ञेय राहील. आपत्तीमध्ये मदत कार्यात तसेच पूर्वतयारीमध्ये सहभागी व्यक्तींनादेखील सदर मदत अनुज्ञेय राहील.
	b) Ex-Gratia payment for loss of a limb or eye (s).	▪ Rs.५९,१००/- per person, when the disability is between ४०% and ६०% . ▪ Rs.२ lakh per person, when the disability is more than ६०%. Subject to certification by a doctor from a hospital or dispensary of Government, regarding extent and cause of disability.
	ब) अवयव अथवा डोळे निकामी झाल्यास देय आर्थिक सहाय्य	▪ ४०% ते ६०% अपंगत्व आल्यास रु.५९,१००/- ▪ ६०% हून अधिक अपंगत्व आल्यास रु.२ लाख इतकी मदत याबाबत अपंगत्वाचे प्रमाण व त्याच्या कारणाबाबत शासकीय दवाखाना / इस्पितळातील वैद्यकीय अधिकाऱ्याने प्रमाणित करणे आवश्यक राहील.
	c) Grievous injury requiring hospitalization	▪ Rs. १२,७००/- per person requiring hospitalization for more than a week. ▪ Rs. ४,३००/- per person requiring hospitalization for less than a week.
	क) जखमी व्यक्ती इस्पितळात दाखल झाला असल्यास	▪ एक आठवड्यापेक्षा अधिक कालावधीकरिता इस्पितळात दाखल झाल्यास रु.१२,७००/- ▪ एक आठवड्यापेक्षा कमी कालावधीकरिता इस्पितळात दाखल झाला असल्यास रु. ४,३००/-

	d) Clothing and utensils/ house hold goods for families whose houses have been washed away/ fully damaged/ severely inundated for more than two days due to a natural calamity.	▪ Rs. १,८००/- per family, for loss of clothing. ▪ Rs. २,०००/- per family, for loss of utensils/ household goods.
	ड) नैसर्गिक आपत्तीमध्ये **<u>दोन दिवसापेक्षा अधिक कालावधीकरिता</u>** क्षेत्र पाण्यात बुडाले असल्यास/ घरे पूर्णत: वाहून गेली असल्यास/ पूर्णत: क्षतीग्रस्त झाली असल्यास कपडे/भांडी/घरगुती वस्तुंकरिता अर्थसहाय्य	▪ प्रतिकुटुंब रु.१,८००/- कपड्याचे झालेल्या नुकसानीकरिता ▪ प्रतिकुटुंब रु.२,०००/-घरगुती भांडी/ वस्तु नुकसानीकरिता
	e) Gratuitous relief for families whose livelihood is seriously affected.	Rs.६०/- per adult and Rs.४५/- per child, not housed in relief camps. State Govt. will certify that identified beneficiaries are not housed in relief camps. Further State Government will provide the basis and process for arriving at such beneficiaries district-wise. Period for providing gratuitous relief will be as per assessment of the State Executive Committee (SEC) and the Central Team (in case of NDRF). The default period of assistance will upto to ३० days, which may be extended upto ६० days in the first instance, if required, and subsequently upto ९० days in case of drought/ pest attack. Depending on the ground situation, the State Executive Committee can extend the time period beyond the prescribed limit subject to that expenditure on this account should not exceed २५% of SDRF allocation for the year.
	आ) नैसर्गिक आपत्तीमध्ये गंभीरपणे प्रभावित झालेल्या कुटुंबियांना दैनंदिन मदत	मदत छावणीमध्ये आश्रय न घेतलेल्या प्रति प्रौढ व्यक्तीस रु.६०/- व प्रति बालकास रु.४५/- मदत अनुज्ञेय राहील. राज्य शासनाने ज्या आपद्ग्रस्तास मदत करावयाची आहे, त्याने मदत छावणीमध्ये आश्रय घेतला नसल्याचे प्रमाणित करावे. त्याचप्रमाणे राज्य शासनाने आपद्ग्रस्तांना कोणत्या पद्धतीने व

		कशा प्रकारे मदत देण्यात येईल याबाबतची जिल्हानिहाय कार्यपध्दती निश्चित करावी. सानुग्रह अनुदान देण्याबाबतचा कालावधी राज्य कार्यकारी समिती आणि (राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद निधीप्रकरणी) केंद्रीय पथक यांनी मूल्यांकित केल्यानुसार निर्धारित करेल. तथापि, सदर कालावधीतील सहाय्य हे (by default) ३० दिवसांचा असेल. तद्नंतर आवश्यकतेनुसार सदर कालावधी प्रथमत: ६० दिवसांपर्यंत वाढविता येईल आणि त्यानंतर दुष्काळ, टोळधाड या कारणास्तव आवश्यकतेनुसार ९० दिवसांपर्यंत सदर कालावधी वाढविता येईल. प्रत्यक्ष आपत्तीची परिस्थिती विचारात घेऊन, राज्य कार्यकारी समितीस सदर कालावधीमध्ये वाढ करता येईल तथापि या बाबीसाठी होणारा खर्च राज्य आपत्ती प्रतिसाद निधीच्या वार्षिक तरतुदीच्या २५ टक्केहून अधिक असता कामा नये.
२	**SEARCH & RESCUE OPERATIONS शोध व बचावमोहीम**	
	(a) Cost of search and rescue measures/ evacuation of people affected/ likely to be affected.	As per actual cost incurred, assessed by SEC and recommended by the Central Team (in case of NDRF). ▪ By the time the Central Team visits the affected area, these activities are already over. Therefore, the State Level Committee and the Central Team can recommend actual/ near - actual costs.
	(अ) शोध व बचाव उपाययोजना / बाधित व्यक्ती / बाधित होणा-या व्यक्तींना सुरक्षितस्थळी हलविण्यासाठीचा खर्च	राज्य कार्यकारी समितीने मूल्यांकित केलेले व (राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद निधीबाबतीत) केंद्रीय पथकाने शिफारस केलेला प्रत्यक्ष खर्च • केंद्रीय पथकाने आपद्ग्रस्त क्षेत्रास भेट देण्यापूर्वी वरील कार्यवाही पूर्ण झालेली असेल, त्यावेळी राज्य स्तरीय समिती आणि केंद्रीय पथक प्रत्यक्ष झालेला खर्च अथवा जवळपास येणारा खर्च याबाबत शिफारस करेल.
	(b) Hiring of boats for carrying immediate relief and saving lives.	As per actual cost incurred, assessed by SEC and recommended by the Central Team (in case of NDRF) The quantum of assistance will be limited to the actual expenditure incurred on hiring boats and essential equipment required for rescuing

		stranded people and thereby saving human lives during a notified natural calamity.
	(ब) प्राण वाचविण्याकरिता तातडीचे मदत कार्य करण्याकरिता बोटी भाड्याने घेतल्या असल्यास	राज्य कार्यकारी समितीने मूल्यांकित केलेले व (राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद निधीबाबतीत) केंद्रीय पथकाने शिफारस केलेला प्रत्यक्ष खर्च विहित नैसर्गिक आपत्तीमध्ये प्राण वाचविण्याकरिता तसेच आपत्तीमध्ये अडकलेल्या व्यक्तींची सुटका करण्याकरिता बोटी भाड्याने घेणे आणि आवश्यक साधनांचा वापर करण्याकरिता येणारा प्रत्यक्ष खर्च अनुज्ञेय असेल.
३	RELIEF MEASURES मदत कार्य	
	a) Provision for temporary accommodation, food, clothing, medical care etc. for people affected/ evacuated and sheltered in relief camps.	As per assessment of need by SEC and recommendation of the Central Team (in case of NDRF), for a period up to ३० days. The SEC would need to specify the number of camps, their duration and the number of persons in camps. In case of continuation of a calamity like drought, or widespread devastation caused by earthquake or flood etc., this period may be extended to ६० days, and up to ९० days in cases of severe drought. Depending on the ground situation, the State Executive Committee can extend the time period beyond the prescribed limit subject to that expenditure on this account should not exceed २५% of SDRF allocation for the year. Medical care may be provided from National Rural Health Mission (NRHM)
	अ) आपत्तीमध्ये मदत छावणीमध्ये आश्रय घेतलेल्या व्यक्तींकरिता तात्पुरती राहण्याची व्यवस्था, अन्नधान्य, कपडे, औषधोपचार इत्यादीकरिता	राज्य कार्यकारी समितीने आवश्यकतेनुसार निश्चित केल्याप्रमाणे आणि केंद्रीय पथकाने शिफारस केल्यानुसार (राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद निधीमधून मदत अनुज्ञेय असल्यास) ३० दिवसांच्या कालावधीकरिता अर्थसहाय्य अनुज्ञेय असेल. राज्य कार्यकारी समितीने मदत छावण्यांची संख्या, कालावधी तसेच छावण्यांतील बाधितांची संख्या, या माहितीच्या आधारे कालावधी व छावण्यांची संख्या निश्चित करेल. भूकंप, पूर, दुष्काळ इ. तीव्र स्वरुपाच्या नैसर्गिक आपत्तीमध्ये सदर कालावधी ६० दिवसांकरिता वाढविता येईल व तीव्र दुष्काळी

		परिस्थितीमध्ये तो ९० दिवसांकरिता वाढविता येईल. प्रत्यक्ष आपत्तीची परिस्थिती विचारात घेऊन, राज्य कार्यकारी समितीस सदर कालावधीमध्ये वाढ करता येईल तथापि या बाबीसाठी होणारा खर्च राज्य आपत्ती प्रतिसाद निधीच्या वार्षिक तरतुदीच्या २५ टक्केहून अधिक असता कामा नये. वैद्यकीय मदत राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य मिशन (NRHM) मधून देण्यात यावी.
	b) Air dropping of essential supplies	As per actual, based on assessment of need by SEC and recommendation of the Central Team (in case of NDRF) ▪ The quantum of assistance will be limited to actual amount raised in the bills by the Ministry of Defence for airdropping of essential supplies and rescue operations only.
	ब) हवाई मार्गे आवश्यक वस्तुंचा पुरवठा करणे	राज्य कार्यकारी समितीने आणि केंद्रीय पथकाच्या शिफारशीनुसार (राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद निधीच्या बाबतीत) आवश्यकतेनुसार प्रत्यक्ष खर्चाच्या आधारे मूल्यांकन करेल. केंद्रीय संरक्षण मंत्रालयामार्फत सादर केलेल्या प्रत्यक्ष खर्चाच्या देयकाच्या मर्यादेत राहील तसेच हवाई मार्गाने आवश्यक वस्तुंचा पुरवठा करणे व बचाव कार्य करणे या प्रयोजनाकरिताच सदर मदत अनुज्ञेय राहील.
	c) Provision of emergency supply of drinking water in rural areas and urban areas.	As per actual cost, based on assessment of need by SEC and recommended by the Central Team (in case of NDRF), up to ३० days and may be extended up to ९० days in case of drought. Depending on the ground situation, the State Executive Committee can extend the time period beyond the prescribed limit subject to that expenditure on this account should not exceed २५% of SDRF allocation for the year.
	क) ग्रामीण व नागरी भागाकरिता पिण्याच्या पाण्याचा आकस्मिक पुरवठा.	राज्य कार्यकारी समितीने आणि केंद्रीय पथकाच्या शिफारशीनुसार (राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद निधीच्या बाबतीत) आवश्यकतेनुसार प्रत्यक्ष खर्चाच्या आधारे मूल्यांकन करेल. हा कालावधी ३० दिवसांसाठी

		असेल व दुष्काळजन्य परिस्थितीत सदर मुदत ९० दिवसांपर्यंत वाढविता येईल. प्रत्यक्ष आपत्तीची परिस्थिती विचारात घेऊन, राज्य कार्यकारी समितीस सदर कालावधीमध्ये वाढ करता येईल तथापि या बाबीसाठी होणारा खर्च राज्य आपत्ती प्रतिसाद निधीच्या वार्षिक तरतुदीच्या २५ टक्केहून अधिक असता कामा नये.
४.	CLEARANCE OF AFFECTED AREAS **क्षतीग्रस्त बाधित क्षेत्र पूर्ववत करणे**	
	a) Clearance of debris in public areas.	As per actual cost within ३० days from the date of start of the work based on assessment of need by SEC for the assistance to be provided under SDRF and as per assessment of the Central team for assistance to be provided under NDRF.
	अ) सार्वजनिक क्षेत्रातील जमा झालेला कचरा व ढिगारे उचलणे.	राज्य आपत्ती प्रतिसाद निधीमधून रक्कम उपलब्ध करुन द्यावयाची झाल्यास राज्य कार्यकारी समितीकडून आवश्यकतेप्रमाणे मूल्यांकनानुसार काम सुरु झाल्याच्या दिवसापासून कामावर ३० दिवसांच्या आंत झालेला प्रत्यक्ष खर्च, राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद निधीमधून रक्कम देय असल्यास केंद्रीय पथकाच्या मूल्यांकनाप्रमाणे मदत उपलब्ध करुन देण्यात यावी.
	b) Draining off flood water in affected areas.	As per actual cost within ३० days from the date of start of the work based on assessment of need by SEC for the assistance to be provided under SDRF and as per assessment of the Central team (in case of NDRF.)
	ब) पूरग्रस्त बाधित क्षेत्रातून पाण्याचा निचरा करण्याबाबत	राज्य कार्यकारी समितीने मूल्यांकित केल्यानुसार, काम सुरु झाल्याच्या दिवसापासून ३० दिवसांच्या आंत कामावर झालेला प्रत्यक्ष खर्च राज्य आपत्ती प्रतिसाद निधीमधून आणि केंद्रीय पथकाने मूल्यांकित केल्यानुसार (राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद निधीप्रकरणी) मदत उपलब्ध करुन देता येईल.
	c) Disposal of dead bodies/ Carcases	As per actual, based on assessment of need by SEC and recommendation of the Central team (in case of NDRF)
	क) मृत देहांची विल्हेवाट लावणे	राज्य कार्यकारी समितीने आणि केंद्रीय पथकाच्या शिफारशीनुसार (राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद निधीच्या बाबतीत) आवश्यकतेनुसार प्रत्यक्ष खर्चाच्या आधारे मूल्यांकन करेल.

५	AGRICULTURE कृषी विषयक	
(i)	Assistance to farmers having landholding upto २ ha. / २ हेक्टर मर्यादेपर्यंत जमीन धारण करणाऱ्या शेतकऱ्यांना मदत	
A.	Assistance for land and other loss / शेतजमिन व इतर नुकसानीसाठी अर्थसहाय्य	
	a) De-silting of agricultural land (where thickness of sand/ silt deposit is more than ३", to be certified by the competent authority of the State Government) b) Removal of debris on agriculture land in hilly areas. c) De-silting / Restoration/ Repair of fish farms.	Rs.१२,२००/- per hectare for each item. (Subject to the condition that no other assistance / subsidy has been availed of by / is eligible to the beneficiary under any other Government scheme)
	अ) शेत जमिनीवरील गाळ (वाळूचा/गाळाचा /मातीचा थर ३ इंचापेक्षा अधिक जमा झाल्याचे, राज्य शासनाच्या प्राधिकृत अधिकाऱ्याने प्रमाणित करणे आवश्यक) ब) डोंगराळ शेत जमिनीवरील मातीचा ढिगारा (मलबा) काढणे. क) मत्स्यशेती दुरुस्ती करणे/ मातीचा थर काढणे/ पूर्ववत करणे	प्रत्येक बाबीकरिता रु.१२,२००/- प्रतिहेक्टर (मात्र लाभार्थ्यांने अन्य कोणत्याही शासकीय योजनेखाली मदत अथवा अर्थसहाय्य / अनुदान घेतलेले नसावे.)
	d) Loss of substantial portion of land caused by landslide, avalanche, change of course of rivers.	Rs. ३७,५००/- per hectare to only those small and marginal farmers whose ownership of the land is legitimate as per the revenue records.
	ड) दरड कोसळणे, जमीन खरडणे, खचणे व नदी पात्र/ प्रवाह बदलल्यामुळे शेत जमिन वाहून जाणे	महसूल अभिलेखानुसार शेत जमिनींचे मालक असलेल्या फक्त अल्प व अत्यल्प भूधारक शेतकऱ्यांना रु.३७,५००/- प्रति हेक्टर या दराने मदत अनुज्ञेय राहील.
B.	Input subsidy (where crop loss is ३३% and above) निविष्ठास्वरुपात मदत (३३% व त्यापेक्षा अधिक झालेल्या शेतीपिकाच्या नुकसानीसाठी)	
	a) For agriculture crops, horticulture crops and	Rs.६,८००/- per ha. in rainfed areas and restricted to sown areas.

	annual plantation crops.	Rs.१३,५००/- Per ha. in assured irrigated areas subject to minimum assistance not less than Rs. १०००/- and restricted to sown areas.
	अ) शेती पिके, फळ पिके आणि वार्षिक लागवडीची पिके	कोरडवाहू क्षेत्रासाठी रु.६,८००/- प्रति हेक्टर आणि पेरणी केलेल्या क्षेत्राच्या मर्यादेत. आश्वासित जलसिंचन योजनेखालील क्षेत्राकरिता रु.१३,५००/- प्रतिहेक्टर कमीत कमी अनुज्ञेय मदत रु.१०००/- पेक्षा कमी नसावी आणि पेरणी केलेल्या क्षेत्राच्या मर्यादेत अनुज्ञेय राहील.
	b) Perennial crops	Rs.१८,०००/-ha. for all types of perennial crops subject to minimum assistance not less than Rs.२,०००/- and restricted to sown areas.
	ब) बहुवार्षिक पीके	बहुवार्षिक पिकांकरिता प्रतिहेक्टरी रु.१८,०००/- सदर मदत पेरणी केलेल्या क्षेत्राकरिताच अनुज्ञेय असून कमीत कमी अनुज्ञेय मदत रु.२,०००/- पेक्षा कमी नसावी.
	c) Sericulture	Rs. ४,८००/- Per ha. for Eri, Mulberry, Tussar. Rs. ६,०००/- per ha. for Muga.
	क) रेशीम उत्पादन	• एरी, मलबेरी, टसर रेशमासाठी रु.४,८००/- प्रतिहेक्टर • मुगा रेशमासाठी रु.६,०००/- प्रतिहेक्टर
(ii)	Input subsidy to farmers having more than २ Ha. of land holding	• Rs.६,८००/- per hectare in rainfed areas and restricted to sown areas. • Rs.१३,५००/- per hectare for areas under assured irrigation and restricted to sown areas. • Rs.१८,०००/- per hectare for all types of perennial crops and restricted to sown areas. Assistance may be provided where crop loss is ३३% and above, subject to a ceiling of २ ha. per farmer
(ii)	२ हेक्टर क्षेत्रापेक्षा जास्त भूधारण करणा-या शेतकऱ्यांना निविष्ठा अनुदान	• कोरडवाहू क्षेत्रासाठी रु.६,८००/- प्रतिहेक्टर आणि पेरणी क्षेत्राच्या मर्यादेत. •आश्वासित जलसिंचन योजनेखालील क्षेत्राकरिता

		रु.१३,५००/- प्रतिहेक्टर आणि पेरणी क्षेत्राच्या मर्यादेत. • सर्व प्रकारच्या बहुवार्षिक पिकांकरिता रु.१८,०००/- प्रति हेक्टर आणि पेरणी क्षेत्राच्या मर्यादेत. ३३% अथवा त्यापेक्षा अधिक शेती पिकांचे नुकसान झाल्यास व २ हेक्टरच्या मर्यादेपर्यंत मदत अनुज्ञेय असेल.
६. ANIMAL HUSBANDARY : ASSISTANCE TO SMALL AND MARGINAL FARMERS		
पशुसंवर्धनाच्या नुकसानीकरिता अल्प व अत्यल्प भूधारक शेतकऱ्यांना सहाय्य		
	i) Replacement of milch animals, draught animals or animals used for haulage.	• Milch animals - Rs. ३०,०००/- Buffalo/ cow/ camel/ yak / mithun etc. Rs. ३,०००/- sheep/ Goat/ Pig • Draught animals- Rs. २५,०००/- Camel/ horse/ bullock, etc. Rs.१६,०००/- calf/ Donkey/ Pony/ Mule • The assistance may be restricted for the actual loss of economically productive animals and will be subject to a ceiling of ३ large milch animal or ३० small milch animals or ३ large drought animal or ६ small draught animals per household irrespective of whether a household has lost a larger number of animals. (The loss is to be certified by the Competent Authority designated by the State Government). Poultry :- Poultry @ Rs.५०/- per bird subject to a ceiling of assistance of Rs.५०००/- per beneficiary household. The death of the poultry birds should be on account of a natural calamity. Note :- Relief under these norms is not eligible if the assistance is available from any other Government Scheme, e.g. loss of birds due to Avian Influenza or any other diseases

		for which the Department of Animal Husbandry has a separate scheme for compensating the poultry owners.
	i) दुधाळ जनावरे , ओढकाम करणारी जनावरे किंवा माल वाहतुकीसाठी वापरण्यात येणारी जनावरे दगावल्यास त्याबदल्यात जनावरे घेण्यासाठी मदत	• दुधाळ जनावरे :- रू. ३०,०००/- म्हैस/ गाय/ उंट /याक/ मिथुन इत्यादी रू. ३,०००/- मेंढी / बकरी / डुक्कर • ओढकाम करणारी जनावरे :- रू.२५,०००/- उंट/ घोडा/ बैल इत्यादी रू. १६,०००/- वासरू / गाढव / शिंगरू/खेचर जरी एखाद्या घरातील जनावरे मोठ्या संख्येने मृत झाली असतील तरी आर्थिकदृष्ट्या मदत ही फक्त उत्पादनक्षम जनावरांपुरती मर्यादीत ठेवावी. ३ मोठे दुधाळ जनावरे किंवा ३० छोटी दुधाळ जनावरे किंवा ३ ओढकाम करणारी मोठी जनावरे किंवा ६ ओढकाम करणारी लहान जनावरे प्रतिकुटुंब या मर्यादेत मदत अनुज्ञेय असावी. (राज्य शासनाच्या प्राधिकृत अधिका-याने नुकसानीबाबत प्रमाणित करणे आवश्यक) **कुक्कुटपालन** :- मदत रू.५०/- प्रती कोंबडी, रू.५,०००/- प्रती कुटुंब मर्यादेत. कोंबड्यांचा मृत्यु हा नैसर्गिक आपत्तीमुळे झालेला असणे आवश्यक. टीप :- अन्य कोणत्याही शासकीय योजनेखाली मदत उपलब्ध करण्यात आली असेल तर या योजनेअंतर्गत मदत अनुज्ञेय असणार नाही. उदा.पक्षांमधील हिवताप किंवा तत्सम रोग यासाठी पशुसंवर्धन विभागाच्या स्वतंत्र योजनेखाली कुक्कुटपालन मालकांना मदत देण्यात येते.
	ii) Provision of fodder/ feed concentrate including water supply and medicines in cattle camps.	Large animals- Rs. ७०/- per day. Small animals- Rs.३५/- per day. Period for providing relief will be as per assessment of the State Executive Committee (SEC) and the Central Team (in case of NDRF) The default period for assistance will be upto ३० days which may be extended upto ६० days in the first instance and in case of severe drought up to ९० days. Depending on the ground situation, the State Executive Committee can

		extend the time period beyond the prescribed limit subject to that expenditure on this account should not exceed २५% of SDRF allocation for the year. Based on assessment of need by SEC and recommendation of the Central Team (in case of NDRF) consistent with estimates of cattle as per Livestock Census and subject to the certificate by the competent authority about the requirement of medicine and vaccine being calamity related.
	ii) जनावरांच्या छावण्यासाठी चारा/ पाणी, पशुखाद्य आणि औषधे उपलब्ध करुन देणे	मोठे जनावर रु.७०/- प्रतिदिन छोटे जनावर रु.३५/- प्रतिदिन राज्य कार्यकारी समिती (SEC) मदतीचा कालावधी निश्चित करेल आणि (राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद निधीबाबतीत) केंद्रीय पथक कालावधी निश्चित करेल. मात्र याबाबतचा ठरवून दिलेला मूळ कालावधी ३० दिवसापर्यंत राहिल. सदर कालावधी प्रथमत: ६० दिवसाकरीता व तीव्र दुष्काळ परिस्थितीमध्ये ९० दिवसांकरीता वाढविता येईल. प्रत्यक्ष आपत्तीची परिस्थिती विचारात घेऊन, राज्य कार्यकारी समितीस सदर कालावधीमध्ये वाढ करता येईल तथापि या बाबीसाठी होणारा खर्च राज्य आपत्ती प्रतिसाद निधीच्या वार्षिक वाटपाच्या २५ टक्केहून अधिक असता कामा नये. याबाबत राज्य कार्यकारी समितीने (SEC) गरजेनुसार निश्चित केलेले आणि केंद्रीय पथकाने (राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद निधीच्या बाबतीत) शिफारस केलेले अंदाज हे पशुगणनेशी सुसंगत आणि सक्षम प्राधिका-यांने औषधी, लसीचा पुरवठा नैसर्गिक आपत्तीशी निगडीत असल्याचे प्रमाणित करण्याच्या अधीन राहून मदत अनुज्ञेय राहील.
	iii) Transport of fodder to cattle outside cattle camps	As per actual cost of transport, based on assessment of need by SEC and recommendation of the Central Team (in case of NDRF) consistent with estimates of cattle as per Livestock Census.
	iii) छावणीतील जनावरां व्यतिरिक्त इतर बाहेरील	राज्य कार्यकारी समितीने आणि (राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद निधीप्रकरणी) केंद्रीय पथकाने शिफारस

	जनावरांसाठी चारा वाहतूक	केल्याप्रमाणे वाहतुकीवरील प्रत्यक्ष खर्चाचे मूल्यांकन पशुधन गणनेच्या संख्येशी सुसंगत असावे.
७	**FISHERY मत्स्य व्यवसाय**	
	i) Assistance to Fisherman for repair/replacement of boats, nets- damaged or lost. -- Boat -- Dugout-Canoe -- Catamaran -- net (This assistance will not be provided if the beneficiary is eligible or has availed of any subsidy/ assistance, for the instant calamity, under any other Government Scheme.)	• Rs.४,१००/- for repair of partially damaged boats only. • Rs.२,१००/- for repair of partially damaged net • Rs.९,६००/- for replacement of fully damaged boats. • Rs.२,६००/- for replacement of fully damaged net.
	i) मत्स्य व्यावसायिकांना बोटीची दुरुस्ती, जाळी यासाठी मदत -बोट -होडी -यांत्रिकी बोट -जाळी (आपत्तीप्रसंगी शासनाच्या अन्य कोणत्याही योजनेखाली अनुदान/ मदत घेतली असल्यास सदर मदत अनुज्ञेय असणार नाही)	• रु.४,१००/- बोटीची अंशत: दुरुस्तीसाठी • रु.२,१००/- अंशत: बाधित झालेल्या जाळ्यांच्या दुरुस्तीसाठी • रु.९,६००/- पूर्णत: नष्ट झालेल्या बोटींकरिता • रु.२,६००/- पूर्णत: नष्ट झालेल्या जाळ्यांसाठी
	ii)Input subsidy for fish seed farm.	Rs.८,२००/- per hectare. (This assistance will not be provided if the beneficiary is eligible or has availed of any subsidy/ assistance, for the instant calamity, under any other Government Scheme, except the one time subsidy provided under the Scheme of Department of Animals Husbandry, Dairying and Fisheries, Ministry of Agriculture)
	ii) मत्स्यबीज शेतीसाठी निविष्ठा	रु.८,२००/- प्रति हेक्टर

	मदत	(पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय व मत्स्योत्पादन विभाग, कृषी मंत्रालय यांच्या योजनेनुसार एकदा दिलेल्या अनुदाना व्यतिरिक्त, आपत्तीप्रसंगी दुसऱ्या कोणत्याही शासनाच्या कोणत्याही योजनेखाली अनुदान/ मदत घेतली असल्यास मदत अनुज्ञेय नाही.)
८	HANDICRAFT/HANDLOOM- ASSISTANCE TO ARTISANS	
	हस्तकला/हातमाग- कारागीरांना मदत	
	i) For replacement of damaged tools/ equipment	Rs.४,१००/- per artisan for equipments. • Subject to certification by the competent authority designated by the Government about damage and its replacement.
	i) खराब झालेल्या सयंत्रांच्या दुरुस्ती किंवा नुतनीकरणासाठी	रु. ४,१००/- प्रति कारागीर सयंत्रांसाठी • राज्य शासनाने निदेशीत केलेल्या सक्षम प्राधिकाऱ्याने सयंत्रांचे नादुरुस्ती व नुतनीकरण प्रमाणित केल्यावर
	ii) For loss of raw material/ goods in process/ finished goods.	Rs.४,१००/- per artisan for raw material. • Subject to certification by the competent authority designated by the State Government about loss and its replacement.
	ii) कच्चा माल /उत्पादनाच्या प्रक्रियेत माल व तयार असलेल्या मालाच्या नुकसानीसाठी	रु. ४,१००/- प्रति कारागीर कच्च्या मालासाठी • राज्य शासनाने निदेशीत केलेल्या सक्षम प्राधिकाऱ्याने नुकसानीमुळे ती (खराब झालेला कच्चा माल) बदलणे आवश्यक असल्याचे प्रमाणित करावे.
९	HOUSING **गृहनिर्माण**	
	a) Fully damaged/ destroyed houses.	Rs.९५,१००/- per house, in plain areas. Rs.१,०१,९००/- per house, in hilly areas including Integrated Action (IAP) districts.
	i) Pucca house	
	ii) Kutcha house	
	b) Severely damaged houses	
	i) Pucca house	
	ii) Kutcha house	
	अ) पूर्णत: नष्ट/ पडझड झालेली घरे	सखल भागासाठी बाधित घरांसाठी रु.९५,१००/- प्रतिघर, दुर्गम भागातील (Integrated Action (IAP) जिल्ह्यासंह) बाधित घरांसाठी रु.१,०१,९००/- प्रति
	i) पक्की घरे	
	ii) कच्ची घरे	

	ब) मोठ्या प्रमाणावर पडझड झालेली घरे	घर
	i) पक्की घरे	
	ii) कच्ची घरे	
	c) Partially Damaged House –	
	i) Pucca (other than huts) where the damage is at least १५%	Rs.५,२००/- per house.
	iii) Kutcha (other than huts) where the damage is at least १५%	Rs.३,२००/- per house.
	क) अंशत: पडझड झालेली घरे -	
	i) पक्की घरे (झोपडी वगळून) जेथे किमान १५ % पडझड झाली असल्यास	रु.५,२००/- प्रति घर
	ii) कच्ची घरे (झोपडी वगळून) जेथे किमान १५ % पडझड झाली असल्यास	रु.३,२००/- प्रति घर
	d) Damaged/ destroyed huts.	Rs.४,१००/- per hut, (Hut means temporary, make shift unit, inferior to Kutcha house made of thatch, mud, plastic sheets etc. traditionally recognized as hut by the State/ District authorities.) Note:- The damaged house should be an authorised construction duly certified by the Competent Authority of the State Government.
	ड) पडझड/ नष्ट झालेल्या झोपड्या	रु. ४,१००/- प्रति झोपडी (झोपडी म्हणजे तात्पुरते काम चलावू झोपडे, कच्च्या घरापेक्षा तकलादू, झावळ्या, माती, प्लास्टिक इत्यादीपासून तयार केलेले राज्य व जिल्हा स्तरीय अधिकाऱ्यांनी झोपडे म्हणून प्रमाणित केलेले) टिप :- राज्य शासनाच्या संबंधित प्राधिका-याने बाधित झालेले घर हे अधिकृत असल्याचे प्रमाणित करणे आवश्यक आहे.

	e) Cattle shed attached with house.	Rs.२,१००/- per shed.
	इ) घराला जोडून असलेला गोठा	रु.२,१००/- प्रति गोठा
१०.	INFRASTRUCTURE पायाभूत सुविधा	
	Repair/ restoration *(of immediate nature)* of damaged infrastructure. (१) Roads & bridges (२) Drinking Water Supply Works, (३) Irrigation, (४) Power (only limited to immediate restoration of electricity supply in the affected areas.) (५) Schools, (६) Primary Health Centers, (७) Community assets owned by Panchayat. Sectors such as Telecommunication and Power (except immediate restoration of power supply), which generate their own revenues and also undertake immediate repair/ restoration works from their own funds/ resources, are excluded.	Activities of immediate nature: Illustrative lists of activities which may be considered as works of an immediate nature are given in the enclosed Appendix. Assessment of requirements : Based on assessment of need, as per States◦ costs/ rates/ schedules for repair, by SEC and recommendation of the Central Team (in case of NDRF). As regards repair of roads, due consideration shall be given to Norms for Maintenance of Roads in India, २००१, as amended from time to time, for repairs of roads affected by heavy rains/ floods, cyclone, landslide, sand dunes, etc. to restore traffic. For reference these norms are • Normal and Urban areas: upto १५% of the total of Ordinary Repair (OR) and Periodical Repair (PR) • Hills : upto २०% of total of OR and PR. In case of repair of roads, assistance will be given based on the notified Ordinary Repair (OR) and Periodical Renewal (PR) of the State. In case OR & PR rate is not available, then assistance will be provided @ Rs.१ lakh/km for State Highway and Major District Road and @ Rs.०.६० lakh/km for rural roads. The condition of "State shall first use its provision under the budget for regular maintenance and

		repair" will no longer be required, in view of the difficulties in monitoring such stipulation, though it is a desirable goal for all the States. In case of repairs of Bridges and Irrigation works, assistance will be given as per the schedule of rates notified by the concerned States. Assistance for micro irrigation scheme will be provided @ Rs.१.५ lakh per damaged scheme. Assistance for restoration of damaged medium and large irrigation projects will also be given for the embankment protions, on par with the case of similar rural roads, subject to the stipulation that no duplication would be done with any ongoing schemes. Regarding repairs of damaged drinking water schemes, the eligible damaged drinking water structures will be eligible for assistance @ Rs.१.५ lakh /damaged structure. Regarding repair of damaged primary and secondary schools, primary health centres, Anganwadi and community assets owned by the Panchayats, assistance will be given @ Rs.२ lakh / damaged structure. Regarding repair of damaged power sector, assistance will be given to damaged conductors, poles and transformers upto the level of ११ kV. The rate of assistance will be @ Rs.४००० / poles, Rs.०.५० lakh per km of damaged conductor and Rs.१.०० lakh per damaged distribution transformer.

१०.	पायाभूत सुविधा :- बाधित झालेल्या मुलभूत सुविधांची (तातडीच्या स्वरुपाची) दुरुस्ती/ पुनर्स्थापना (१) रस्ते व पूल, (२) पाणी पुरवठा कामे/योजना, (३) सिंचन व्यवस्था, (४) वीज पुरवठा (बाधित क्षेत्रात तातडीने वीज पुरवठा पुनर्स्थापित करण्यापुरते मर्यादित) (५) शाळा, (६) प्राथमिक आरोग्य केंद्रे, (७) पंचायतीच्या मालकीची सामाजिक मालमत्ता दूरसंचार व्यवस्था व ऊर्जा (तातडीने वीज पुरवठा पुनर्स्थापित करणे वगळून) निर्माण करणा-या व त्यापासून महसूल मिळविणाऱ्या व स्वत:च्या निधीतून तातडीची दुरुस्ती व पुनर्स्थापनेची कामे करणारे क्षेत्र वगळून.	<u>तातडीची स्वरुपाची कामे</u> :- सोबतच्या परिशिष्टात कोणती कामे तातडीची स्वरुपात समजावी याची नमुना यादी दिली आहे. <u>मूल्यांकनाच्या अंदाजाबाबत</u> :- राज्य कार्यकारी समितीने निकडीनुसार राज्यातील दुरुस्तीचे दर/किंमत/ दुरुस्तीचा कालावधी निर्धारित करावे तसेच (राष्ट्रीय आपत्ती निधीच्या अनुषंगाने) केंद्रीय पथकाच्या शिफारशीनुसार मदत अनुज्ञेय राहील. अतिवृष्टी / पूर / चक्रीवादळ / भुस्खलन / वाळूचा ढिगारा इत्यादीमुळे बाधित झालेल्या रस्त्यांची दळणवळण पुनर्स्थापित करण्यासाठी रस्त्यांच्या दुरुस्तीसाठी, भारतातील रस्ते दुरुस्ती २००१ च्या मानकानुसार विहित केलेल्या व वेळोवेळी दुरुस्ती करण्यात आलेल्या अटी व शर्ती विचारात घ्याव्यात. संदर्भासाठी हे निकष खालीलप्रमाणे आहेत:- • सर्वसाधारण व नागरी भागांसाठी:- सर्वसाधारण दुरुस्तीच्या व नियतकालिक दुरुस्तीच्या एकूण रकमेच्या १५% • टेकड्या:- सर्वसाधारण दुरुस्तीच्या व नियतकालिक दुरुस्तीच्या एकूण रकमेच्या २०% रस्त्यांच्या दुरुस्तीकरिता राज्य शासनाने अधिसूचित केलेल्या सर्वसाधारण दुरुस्ती व नियतकालिक दुरुस्तीवर आधारित अर्थसहाय्य अनुज्ञेय राहील. जर सर्वसाधारण दुरुस्ती व नियतकालिक दुरुस्तीचे दर उपलब्ध नसतील तर राज्य महामार्ग व प्रमुख जिल्हे रस्त्यांकरिता रु.१ लाख प्रति कि.मी. आणि ग्रामीण रस्त्यांकरिता रु.०.६० लाख प्रति कि.मी. प्रमाणे अर्थसहाय्य अनुज्ञेय राहील. मात्र "राज्य शासनाने त्यांच्या अर्थसंकल्पात नियमित देखभाल व दुरुस्ती करिता केलेली तरतूद प्रथमत: वापरण्यात यावी" ही अट अस्तित्वात राहणार नाही. कारण याबाबतच्या अटीचे संनियत्रंण करणे अवघड होते. तरीदेखिल याबाबतची प्रथम जबाबदारी सर्व राज्यांची आहे.

		जलसिंचन व्यवस्था व पूलांच्या दुरुस्तीसाठी राज्य शासनाने अधिसूचित केलेल्या दरानुसार मदत अनुज्ञेय राहील. लघु सिंचन व्यवस्थांकरिता क्षतिग्रस्त योजनेसाठी रु.१.५० लाख प्रमाणे अर्थसहाय्य अनुज्ञेय राहील. क्षतिग्रस्त झालेले मध्यम व मोठे प्रकल्पांच्या पुनर्स्थापनेसाठी बंधा-याच्या क्षतिग्रस्त भागाकरिता ग्रामीण रस्त्यांसाठी निर्धारित केलेल्या दराच्या धर्तीवर अर्थसहाय्य अनुज्ञेय राहील. मात्र अस्तित्त्वात असलेल्या योजनेमधून त्यासाठी अर्थसहाय्य अनुज्ञेय असता कामा नये. क्षतिग्रस्त झालेल्या पिण्याच्या पाण्याच्या योजनेबाबत पात्र असलेल्या क्षतिग्रस्त पिण्याच्या पाण्याच्या संरचनेच्या दुरुस्तीकरिता रु.१.५० लाख प्रमाणे मदत अनुज्ञेय राहील. क्षतिग्रस्त झालेल्या प्राथमिक व माध्यमिक शाळा, प्राथमिक आरोग्य केंद्रे, आंगणवाडी आणि पंचायतीच्या मालकीच्या सामुदायिक मालमत्तेच्या दुरुस्तीकरिता रु.२ लाख प्रती संरचना याप्रमाणे अर्थसहाय्य अनुज्ञेय राहील. क्षतिग्रस्त झालेल्या उर्जा क्षेत्रातील बाधित झालेल्या ११ केव्ही पर्यंतच्या ट्रान्सफॉर्मर, खांबा आणि कन्डक्टर साठी मदत अनुज्ञेय असेल. प्रतिखांब रु.४०००/-, बाधित कन्डक्टरकरिता रु.०.५० लाख प्रति कि.मी. आणि बाधित झालेल्या ट्रान्सफॉर्मरकरिता रु.१ लाख प्रमाणे मदतीचे दर राहतील.
११	PROCUREMENT पुरवठा	
	Procurement of essential search, rescue and evacuation equipments including communication equipments, etc. for response to disaster.	- Expenditure is to be incurred from SDRF only (and not from NDRF), as assessed by the State Executive Committee (SEC). - The total expenditure on this item should not exceed १०% of the annual allocation of the SDRF.
११	आपत्तीला प्रतिसाद देण्यासाठी तसेच शोध कार्य, बचाव कार्य,	• राज्य कार्यकारी समितीने मूल्यांकित केल्यानुसार राज्य आपत्ती प्रतिसाद निधीमधूनच खर्च करावा.

	स्थलांतरण इत्यादींसाठी लागणारी उपकरणे व दळणवळणाची साधने	(राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद निधीतून नाही.) • राज्य आपत्ती प्रतिसाद निधीच्या एकूण वार्षिक तरतुदीच्या १०% पेक्षा अधिकची रक्कम या बाबीवर खर्च करु नये.
१२.	Capacity Building	Expenditure is to be incurred from SDRF only (and not from NDRF), as assessed by the State Executive Committee (SEC) The total expenditure on this item should not exceed ५% of the annual allocation of the SDRF.
१२.	क्षमता बांधणी	राज्य कार्यकारी समितीच्या मूल्यांकनानुसार याकरिता फक्त राज्य आपत्ती प्रतिसाद निधीमधून खर्च अनुज्ञेय असेल (केंद्रीय आपत्ती प्रतिसाद निधीमधून नाही). याकरिता राज्य आपत्ती प्रतिसाद निधीच्या वार्षिक तरतुदीच्या ५% हून अधिक खर्च अनुज्ञेय नाही.
१३.	State specific disaster within the local context in the State, which are not included in the notified list of disasters eligible for assistance from SDRF / NDRF, can be met from SDRF within the limit of १०% of the annual funds allocation of the SDRF.	Expenditure is to be incurred from SDRF only (and not from NDRF), as assessed by the State Executive Committee (SEC). The norm for various items will be the same as applicable to other notified natural disaster, as listed above. or In these cases, the scale of relief assistance against each item for local disaster should not exceed the norms of SDRF. The flexibility is to be applicable only after the State has formally listed the disasters for inclusion and notified transparent norms and guidelines with a clear procedure for identification of the beneficiaries for disaster relief for such local disasters॰, with the approval of SEC.

१३.	राज्य शासनाने त्यांच्या स्थानिक आपत्तीकरिता जे राज्य आपत्ती प्रतिसाद निधीच्या निकषानुसार अनुज्ञेय नसतील अशा आपत्तींसाठी राज्य आपत्ती प्रतिसाद निधीच्या वार्षिक तरतुदीच्या १०% मर्यादेपर्यंत राज्य आपत्ती प्रतिसाद निधीमधून खर्च अनुज्ञेय राहील.	राज्य कार्यकारी समितीने मूल्यांकित केलेला मात्र केवळ राज्य आपत्ती प्रतिसाद निधीमधून खर्च अनुज्ञेय (केंद्रीय आपत्ती प्रतिसाद निधीमधून नाही). अन्य अधिसूचित नैसर्गिक आपत्तींकरिता वर नमूद केलेल्या मानकानुसार विविध बाबींकरीता मदत सारख्या प्रमाणात राहील किंवा, अशा प्रकरणी राज्य आपत्ती प्रतिसाद निधीनुसार ठरविलेल्या दरापेक्षा अधिक दराने स्थानिक आपत्तींकरिता मदत अनुज्ञेय असणार नाही. यासंदर्भात राज्य शासनाने स्थानिक आपत्तींची सूची निर्धारित करणे आवश्यक आहे, जेणेकरुन वर नमूद निकष व दरानुसार स्थानिक आपत्तींकरिता मदत देण्यामध्ये पारदर्शकता राहील. त्याकरिता एक प्रक्रिया निश्चित करुन स्थानिक आपत्तीमध्ये बाधित लाभार्थी यांना राज्य कार्यकारी समितीच्या मान्यतेने मदत देणे शक्य होईल.

Note : i) The State Governments are to take utmost care and ensure that all individual beneficiary-oriented assistance is necessary / mandatory disbursed through the bank account (viz. Jan Dhan Yojana etc.) of the beneficiary.

ii) The scale of relief assistance against each items for all disaster including local disaster should not exceed the norms of SDRF / NDRF. Any amount spent by the State for such disasters over and above the ceiling would be borne out of the resources of the State Government and not from SDRF.

टिप :- १) राज्य शासनाने लाभार्थ्यांना मदत संवितरण करताना शक्यतो लाभार्थ्यांच्या बँक खात्यात (उदा.जन धन योजना इ.) जमा करण्याबाबत योग्य ती खात्री करावी.

२) स्थानिक आपत्तींकरीता मदत देताना प्रत्येक बाबीसाठी ती राज्य आपत्ती प्रतिसाद निधी/राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद निधीपेक्षा अधिक असू नये. अशा प्रकारच्या आपत्तीकरिता नमूद मर्यादेपेक्षा अधिकची रक्कम राज्य शासन देत असल्यास त्याबाबतचा अधिकचा खर्च राज्य शासनाने राज्य आपत्ती प्रतिसाद निधीमधून न करता त्यांच्या निधीमधून तो सोसावा.

APPENDIX
(Item No. 10)

Illustrative list of activities identified as of an immediate nature.

1. **Drinking Water Supply :**

   i) Repair of damaged platforms of hand pumps/ring wells/ spring-tapped chambers/public stand posts, cisterns.
   ii) Restoration of damaged stand posts including replacement of damaged pipe lengths with new pipe lengths, cleaning of clear water reservoir (to make it leak proof).
   iii) Repair of damaged pumping machines, leaking overhead reservoirs and water pumps including damaged intake – structure, approach gantries/jetties.

2. **Roads**

   i) Filling up of breaches and potholes, use of pipe for creating waterways, repair and stone pitching of embankments.
   ii) Repair of breached culverts.
   iii) Providing diversions to the damaged/washed out portions of bridges to restore immediate connectivity.
   iv) Temporary repair of approaches to bridges/ embankments of bridges., repair of damaged railing bridges, repair of causeways to restore immediate connectivity, granular sub base, over damaged stretch of roads to restore traffic.

3. **Irrigation :**

   i) Immediate repair of damaged canal structures and earthen/masonry works of tanks and small reservoirs with the use of cement, sand bags and stones.
   ii) Repair of weak areas such as piping or rat holes in dam walls/ embankments.
   iii) Removal of vegetative material/building material/debris from canal and drainage system.
   iv) Repair of embankments of minor, medium and major irrigation projects.

4. **Health :**

   Repair of damaged approach roads, buildings and electrical lines of PHCs/ community Health Centres.

. **Community assets of Panchayat**

   a) Repair of village internal roads.
   b) Removal of debris from drainage/ sewerage lines.
   c) Repair of internal water supply lines.
   d) Repair of street lights.
   e) Temporary repair of primary schools, Panchayat ghars, community halls, *anganwadi*, etc.

Power: Poles/ conductors and transformers upto 11 kv.

8

7. The assistance will be considered as per the merit towards the following activities:

	Items/ Particulars	Norms of assistance will be adopted for immediate repair
i)	Damaged primary school building Higher secondary/ middle/ college and other educational institutions buildings	Up to Rs. 1.50 lakh/ unit Not covered
ii)	Primary Health Centre	Upto Rs. 1.50 lakh/ unit
iii)	Electric poles and wires etc.	Normative cost (Upto Rs.4000 per pole and Rs. 0.50 lakh per km)
iv)	Panchayat Ghar/ Anganwadi/ Mahila Mondal/ Yuva Kendra/ Community Hall	Upto 2.00 lakh/ unit
v)	State Highways/ Major District road	Rs. 1.00 lakh/ km *
vi)	Rural road/ bridge	Rs. 0.60 lakh/km *
vii)	Drinking water scheme	Upto 1.50 lakh/ unit
viii)	Irrigation Sector: Minor irrigation schemes/ Canal Major irrigation scheme Flood control and anti Erosion Protection work	 Upto Rs. 1.50 lakh/ scheme Not covered Not covered
ix)	Hydro Power Project/ HT Distribution systems/ Transformers and sub stations	Not covered
x)	High Tension Lines (above 11 kv)	Not covered
xi)	State Govt Buildings viz. departmental/ office building, departmental/ residential quarters, religious structures, patwarkhana, Court premises, play ground, forest bungalow property and animal/ bird sanctuary etc.	Not covered
xii)	Long terms/ Permanent Restoration work incentive	Not covered
xiii)	Any new work of long term nature	Not covered
xiv)	Distribution of commodities	Not covered. (However, there is a provision for assistance as GR to families in dire need of assistance after a disasters).
xv)	Procurement if equipments/ machineries under NDRF	Not covered
xvi)	National Highways	Not covered (Since GOI born entire expenditure towards restoration works activities)
xvii)	Fodder seed to augment fodder production	Not covered

* If OR & PR rates are not provided by the State.

*****